Form-scheme

१२} बंगलो / रो—हाऊस यांचे विक्रीपत्र पंजीबध्द झाल्यानंतर यवतमाळनगर पालिका, नगर भूमापन कार्यालय व इतर ठिकाणी नामांतरण करून घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. यासाठी सोसायटी कुठल्याही प्रकारचे शुल्क देणार नाही. परंतु नियमांना अधिन राहून नामांतरणासाठी "ना—हरकत पत्र" देईल.

१३} सोसायटीतर्फे बांधण्यात आलेल्या गाळे योजनेत सोसायटीतर्फे बंगलो / रो—हाऊसचे बांधकाम पूर्ण होवून, विक्रीपत्र करून घ्यावे असा इतल्ला सोसायटीने अर्जदारास दिल्या तारखेपासून ३० दिवसांचे आंत विक्रीपत्र करून न घेतल्यास या मुदतीनंतर इलेक्ट्रीक बील व पाण्याचे बील भरण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. तसेच इलेक्ट्रीक बीलाचा भरणा न केल्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून वैयक्तीक इलेक्ट्रीक कनेक्शन कपात झाल्यास याची जबाबदारी बंगलो / रो—हाऊसधारकांची राहील.

१४} या योजनेतील कॉमन इलेक्ट्रीक मीटरचे बील, कॉमन पाण्याचे मीटर बील तसेच इमारत देखभाल निधी विक्रीपत्र करून घ्यावे असा इतल्ला दिल्या तारखेपासून बंगलो / रो—हाऊसधारकांना देय राहील. यासाठी महाराष्ट्र अपार्टमेंट कायदा १९७० च्या तरतूदी लागू होतील.

१५} बंगलो / रो—हाऊसचे विक्रीपत्र पंजीबध्द झाल्या नंतर व बंगलो / रो—हाऊसचा ताबा घेतल्यानंतर कोणत्याही प्रकारचे कामे सोसायटीतर्फे करून दिल्या जाणार नाहीत. तसेच सोसायटीचे पोटनियम व संबंधित कायद्याच्या तरतुदी तसेच सोसायटीच्या प्रबंध समितीने वेळोवेळी घेतलेले हयासंबंधीचे ठराव / निर्णय मला मान्य व कबुल राहतील.

१६} घरकुल/बंगल्याचे किंमतीबाबत भरणा करण्यासंबंधी नियम व अटी —

अ) कर्ज न घेणाऱ्यासाठी —
आरक्षणासाठी जमा केलेली रक्कम वजा जाता आरक्षित केलेल्या घराचे किंमतीपैकी बकाया रक्कम .... पासून .... समान मासिक हप्त्यात सोसायटीत जमा करावी लागेल.

ब) कर्ज घेणाऱ्यासाठी —
१) अर्जदाराचे परतफेडीचे क्षमतेनुसार कर्जाची रक्कम ठरविल्या जाईल.
२) वर नमूद केल्याप्रमाणे कर्जाची रक्कम ठरल्यावर, घराचे किंमतीमधून आरक्षणासाठी जमा केलेली रक्कम अधिक कर्जाची रक्कम वजा जाता घराचे किंमतीपैकी उर्वरित रक्कम .... पासून ...... समान मासिक हप्त्यात सोसायटीमध्ये जमा करावी लागेल.

क) मासिक हप्ते सलग ३ महिने न भरल्यास नियमाप्रमाणे आरक्षित केल्याचे आवंटन रद्द करण्यात येईल व सोसायटीमध्ये जमा केलेली रक्कम ५ टक्के कपात करून वापस करण्यात येईल.

ड) घराचे बांधकाम पूर्ण झाल्यावर घराचे विक्रीपत्र करून दिल्या जाईल व तशी लेखी सुचना दिल्या जाईल. परंतू सुचना दिल्यापासून १ महिन्याचे आंत खरेदीखत करून गहाणखत सोसायटीचे नावे करून न दिल्यास मंजूर केलेल्या कर्जाचे रकमेवर द. सा. द. शे. १२ टक्के व्याज द्यावे लागेल.

१७} वरील अटी व शर्थी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत व त्यासाठी मी खाली सही करीत आहे.